“परभणी जिल्ह्यातील ‘प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र’या कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत शिक्षणस्त्र विद्याशाखेतील शिक्षणस्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा (Synopsis)

सन - 2017

*** संशोधक ***

दांडगे शंकर उत्तमराव

(एम.ए.,एम.एड् , एम.फील (इतिहास))

*** मार्गदर्शक ***

प्रा.डॉ.म्हस्के विशाखा पांडुरंग

(एम.ए. (इंग्रजी,मानसशास्त्र,भुगोल) एम.एड्.सेट,पीएच.डी.)

अधिव्याख्याता

श्री. शारदा भवन शिक्षण संस्थेचे अध्यापक महाविद्यालय नांदेड

*** सादर स्थळ ***

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

ऑगष्ट 2017

अनुक्रमाणिका

अनु.क्र.	मुद्दे व उपमुद्दे	पान क्र.
1	प्रस्तावना	1
2	संशोधन समस्या विधान	2
3	समस्या विधानातील शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या	2
4	संशोधनाची गरज	3
5	संशोधन विषयाचे महत्व	4
6	संशोधनाची उद्दिष्टये	5
7	संशोधनाची गृहितके	5
8	संशोधनाची परिकल्पना	6
9	संशोधन समस्येची व्याप्ती	6
10	संशोधन समस्येची मर्यादा	6
11	संशोधन कार्यपध्दती	7
12	पथदर्शक अभ्यास	8
13	अहवाल प्रकरण योजना	9
14	संशोधन कार्यवाहीचे टप्पे	10
15	संदर्भ ग्रंथसूची	11

1. प्रस्तावना

भारत देशाला शिक्षणाचा समृध्द वारसा लाभलेला आहे. प्राचीन ग्रंथात नालंदा, तक्षशीला अशा जगभरात नावारुपास आलेल्या विद्यापीठांचा उल्लेख आहे. असे असले तरी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण कधीही झालेले नव्हते.

ब्रिटीशकालीन भारतात शिक्षणाला बरीच चालना मिळाली इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना शिक्षणाचे महत्त्व समजले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाचे महत्त्व वाढले व सार्वत्रिकीकरणाचा विचार झाला. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार देशातील 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत शिक्षणाची तरतुद करण्यात आली. ही जबाबदारी शासनाची राहील अशी ग्वाही देण्यात आली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात सर्वाना दर्जेदार व मोफत शिक्षण मिळावे यासाठी विविध आयोग नेमले व त्यांच्या शिफारशी नुसार विविध उपक्रम राबविले गेले. तरीही शिक्षण सर्वांपर्यत पोहचलेले दिसत नाही म्हणूनच भारत सरकारने 2009 साली ‘बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009’ (RTE 2009) पारीत केला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने ‘महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम 2011’ पारीत केला व या अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षण घेणे हा बालकांचा मूलभूत अधिकारच बनला.

देशातील सर्व बालकांना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे.यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विविध अभियान जसे **सर्व शिक्षा अभियान, गुणवत्ता विकास कार्यक्रम, किमान अध्ययन क्षमता कार्यक्रम, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन** इ.अभियान राबविले गेले आहेत. तरी देखिल आपण अपेक्षित गुणवत्ता साध्य करु शकलेलो नाहीत.

आजच्या माहीती व तंत्रज्ञानाच्या काळात, स्पर्धेच्या वातावरणात विद्यार्थ्यांची गुणवत्ता हा सर्वांच्याच चिंतेचा विषय बनला आहे. याच विचारातून महाराष्ट्र राज्याचे शिक्षण सचिव मा. नंदकुमार साहेबांच्या संकल्पनेतून साकारलेला **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** हा कार्यक्रम आहे. जून 2015 पासून महाराष्ट्र राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये (1 ली ते 8 वी) राबविला जात आहे.

शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित क्षमता प्राप्त व्हाव्यात व यांचे मूल्यमापन व्हावे यासाठी विविध उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. यासाठी शिक्षक-पालक व अधिकारी यांचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे. या सर्व विविध उपक्रमाचा सकारात्मक परिणाम होऊन सर्व शाळातील सर्व विद्यार्थी प्रगत होणार आहेत. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हे राष्ट्रहिताचे कार्य आहे. हे स्वप्न पूर्ण होण्यासाठी संबधित सर्व घटकांनी सक्रीय योगदान देणे आवश्यक आहे.

2. समस्या विधान

“परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांमधील **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास”

2.1 समस्येचे स्पष्टीकरण

सदरील समस्येचे स्वरुप हे परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे व्यवस्थापन असलेल्या मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** या कार्यक्रमाची अमलबजावणी व परिणामकारकता यांची चिकित्सा करणे असे आहे.

3. समस्या विधानातील परिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

परभणी जिल्हा :- महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा. ज्यामध्ये नऊ तालुक्यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषद :- संपूर्ण जिल्ह्यातील शाळांचे व्यवस्थापन करणारी जिल्हा स्तरावरल एक स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हा परिषद

उच्च प्राथमिक शाळा :- परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे व्यवस्थापन असलेल्या इय्यत्ता 1 ली ते 7 व 8 वी पर्यंतच्या शाळा म्हणजे उच्च प्राथमिक शाळा.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम :- जून 2015 पासून महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार, महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये राबविला जात असलेला उपक्रम म्हणजे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम

परिणामकारकता :- ज्या कारणांसाठी उपक्रम राबविला गेला त्यामध्ये घडलेला बदल म्हणजे परिणाम कारकता

चिकित्सा :- एखाद्या घटनेची शास्त्रीय अधारावर केलेली मांडणी म्हणजे चिकीत्सा.

3.1 संकल्पनात्मक विश्लेषण

1.



2.



4. संशोधनाची गरज

कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही शिक्षणावरच अवलंबून असते हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. आपल्या देशातही शिक्षणाचे महत्व ओळखून शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग केले जात आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देवून त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने जून 2015 पासून राज्यात **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** हा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे.

हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये राबविला जात आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळा व गुणवत्ते संबधी समाजात वेगवेगळया सकारात्मक व नकारात्मक प्रतिक्रीया व्यक्त होत असतात.या शाळांमध्ये अपुऱ्या भौतिक सुविधा, अपुरी शिक्षक संख्या, अनुपस्थिती, गळती इ.समस्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे** स्वप्न साकार होण्याच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्रात हा कार्यक्रम राबविला जात आहे.

परभणी जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही अनेक समस्या आहेत. या सर्व समस्येवर मात करुन येथे कार्यरत असलेले शिक्षक बांधव विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी कसे प्रयत्न करत आहेत ? त्यासाठी काणते उपक्रम राबवित आहेत ? यासाठी समाजाची मदत होते का ? विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली काय ? शाळा प्रगत झाल्या काय ? व प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम परिणामकारक ठरला काय ? इ. प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

5. संशोधन विषयाचे महत्त्व

मुलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व नैतिक विकासाचे केंद्र म्हणून प्राथमिक शाळांकडे पाहीले जाते. उद्याचा सुजाण, सुसंस्कृत नागरिक घडवायचा असेल तर त्याला दर्जेदार प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे. मुलांच्या सर्व क्षमता विकसित झाल्या पाहीजेत. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास झाला पाहीजे. प्रत्येक विद्यार्थ्यांना इय्यत्ता निहाय अपेक्षित वाचन, लेखन, गणिती क्रीया करता आल्या पाहीजेत. तरच प्रगती झाली असे म्हणता येईल.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हे एक स्वप्न आहे. यामध्ये प्रत्येक शाळेतील सर्व विद्यार्थी प्रगत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील एकही मूल अ-प्रगत राहणार नाही असे शिक्षण दिले जात आहे. प्रत्येक इय्यतेच्या किमान मूलभूत क्षमता त्यांने संपादन केल्या पाहीजेत यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. समाजाच्या मदतीने यासाठी वातावरण निर्मिती केली जात आहे.

हा कार्यक्रम यशस्वी झाला तर **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** या कार्यक्रमाचे मोठे यश ठरेल. अशा या महत्वाकांक्षी कार्यक्रमावर संशोधन व्हावेच. ह्या उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

5.1 पूर्वीचे संशोधन

सदरिल विषयाच्या अनषंगाने या पूर्वीची संशोधने व संशोधन अहवालाचा आढावा घेण्यात येईल.

5.2. वैयंक्तीक अनुभव

प्रस्तूत संशोधक हे परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षक पदावर कार्यरत असून सदरील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम त्यांच्या शाळेवरही राबविला जात आहे.

या संबधीचा त्यांना अनुभव आहे.

6. संशोधनाची उद्दिष्टे

1. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या चाचण्यांच्या आयोजनाचा आढावा घेणे.

2. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या चाचण्याव्दारे विद्यार्थ्यांची प्रगती कशी मोजली जाते याची माहिती घेणे.

3. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** हा कार्यक्रम राबविण्यात पर्यवेक्षीय अधिकारी यांची भूमिका काय याचा शोध घेणे.

4. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी व शाळा प्रगत होण्यासाठी राबविल्या जानाऱ्या उपक्रमांचा शोध घेणे.

5. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमांतर्गत अ-प्रगत बालकांना प्रगत करण्यासाठी राबविले जानाऱ्या विशेष उपक्रमांची माहिती घेणे.

6. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमाची परिणामकारकता तपासूणे

7. संशोधनाची गृहीतके

1. महाराष्ट्र सरकारने राज्यांतील सर्व शाळांमध्ये **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रम राबविण्या बाबत अध्यादेश काढला आहे.

2. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांचा समावेश असेल.

3. अध्ययन-अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

4. चाचण्यामधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची तपासणी करता येते व गुणवत्ता वाढीसाठी उपाय योजना करता येते.

5. सर्व शाळांमध्ये हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असावा.

8. संशोधनाची परिकल्पना

1. जर **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रम प्रभावीपणे राबविला गेला तर सर्व शाळा व सर्व विद्यार्थी प्रगत होतात.

2. जर अध्ययन-अध्यापनात नव नवीन उपक्रम राबविले गेले तर विद्यार्थ्यांना शिकण्यास पोषक वातावरण निर्माण होईल.

3. विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी लक्षात आली तर त्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विशेष उपक्रम राबविता येतील.

4. विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त ठरेल.

5. शिक्षक-विद्यार्थी-पालक-अधिकारी यांनी सक्रीय योगदान दिले तर **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** हा कार्यक्रम परिणामकारक ठरेल.

9. संशोधन समस्येची व्याप्ती

क्षेत्र व्याप्ती :- प्रस्तूत संशोधनाची क्षेत्र व्याप्ती ही परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे व्यवस्थापन असलेल्या मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळांपूरती मर्यादीत आहे.

आशयव्याप्ती :- प्रस्तूत संशोधनात संबधित शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** या उपक्रमांचा अभ्यास केला जाणार आहे.

कालावधी व्याप्ती :- प्रस्तूत संशोधन हे सन 2017 पासून सुरु होऊन विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालवधीत पूर्ण केले जाणार आहे.

नमुना व्याप्ती :- प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या व्यवस्थापनाच्या मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळाची निवड ही नमुना निवड म्हणून करण्यात येईल.

10. संशोधन समस्येची मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांपूरते मर्यादीत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील,प्राथमिक शाळा,माध्यमिक शाळा, उर्दू माध्यमाच्या शाळा, इंग्रजी माध्यमाच्या शाळा व खाजगी व्यवस्थापन असलेल्या शाळांचे संशोधन करण्यात येणार नाही.

क्षेत्र मर्यादा :- प्रस्तुत संशोधन समस्येची क्षेत्र मर्यादा ही परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पूरतीच मर्यादीत आहे.

आशय मर्यादा :- या शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाच्या परिणामकारकते पूरती मर्यादीत आहे.

काल मर्यादा :- विद्यापीठाने ठरवून दिलेल्या काल मर्यादेत संशोधन पूर्ण करण्यात येईल.

नमुना मर्यादा :- प्रस्तुत संशोधनात नमुना निवड ही परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे व्यवस्थापन असणाऱ्या मराठी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळा पुरतीच मर्यादीत आहे.

11. संशोधन कार्यपध्दती

11.1 संशोधन अभिकल्प :-

प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांमधील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचा समावेश आहे. हा संशोधनाचा **एकलगट** अभिकल्प आहे.

11.2 संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने सर्वेक्षण पध्दतीने पूर्ण करण्यात येईल.

या संशोधनामध्ये परभणी जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषदेचे व्यवस्थापन असणाऱ्या उच्च प्राथमिक शाळांना भेटी देऊन, शिक्षकांना प्रश्नावली देऊन मुख्याध्यापकाना प्रश्नावली देऊन, विद्यार्थी व पालकांना भेटी देऊन त्यांच्या कडून माहीती घेणे व संबधित पर्यवेक्षीय अधिकारी यांच्या मुलाखती घेवून माहिती संकलित करण्यात येणार आहे. म्हणून प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण या पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

11.3 **संशोधनाची जनसंख्या** :- प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांची निवड करण्यात आली आहे.

11.4 **संशोधनाचा न्यादर्श** :- प्रस्तूत संशोधनात परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांची निवड करण्यात आली आहे.

11.5 **नमुना निवड** :- प्रस्तूत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पध्दतीमध्ये जनसंख्या लक्षात घेवून **सहेतूक नमुना निवड** पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

11.6 **सांख्यिकीय परिमाणे** :- प्रस्तूत संशोधनात शेकडेवारी सहसंबध, व सहसंबध गुणक ही परिमाणे वापरण्यात येतील.

11.7 **संशोधनाची माहिती मिळविण्याची साधने** :- प्रस्तुत संशोधनासाठी खालील साधनतंत्रे वापरण्यात येतील.

1. प्रश्नावाली

2. मुलाखत

3. निरीक्षण

11.8 **संशोधन साधनांची विश्वसनियता व सप्रमाणता** :-

प्रस्तुत संशोधनासाठी साधन म्हणून वापरली जाणारी प्रश्नावली तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रमाणीत करण्यात येईल.परिकल्पनेत मांडलेला आशावाद फलद्रुप होण्यास प्रश्नावली, मुलाखत पध्दतीची विश्वसनियता तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रमाणित करण्यात येईल.

12. पथदर्शक अभ्यास

12.1 **पथदर्शक अभ्यासासाठी नमुना** :- प्रस्तुत संशोधना करिता प्रथम निवडक शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांना गृहीत धरुन त्यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेण्यात येतील. त्यांच्या कडील प्रश्नावलीचा परिणाम लक्षात घेऊन प्रत्यक्ष कृती करण्यात येईल.

12.2 **साधने** :- प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, यांच्यासाठी प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात येईल. काही विद्यार्थी यांच्या साठी मतावलीचा वापर करण्यात येईल. काही पालक व पर्यवेक्षीय अधिकारी यांच्यासाठी मुलाखत हे साधन वापरण्यात येईल.

12.3 **पथदर्शक अभ्यासाची कार्यवाही** :- प्रस्तुत संशोधनासाठी एकूण जनसंख्येच्या एक टक्के शाळांचा विचार करुन नंतर कार्यवाही करण्यात येईल.

12.4 **संशोधन कार्यवाही** :- प्रस्तुत संशोधनासाठी प्रथम निवडक शाळांना गृहीत धरुन त्यांच्या कडील प्रश्नावलीचा परिणाम लक्षात घेवून प्रत्यक्ष कृती करण्यात येईल.

13. अहवाल प्रकरण योजना :-

प्रस्तुत संशोधन अहवाल लेखनातील प्रकरणाची संख्या, त्याचा क्रम, प्रकरणाची नावे, प्रत्येक प्रकरणातील मुद्दे इ. सर्व माहीती अहवालामध्ये नमुद करण्यात येईल.

13.1 **प्रकरण पहिले - प्रस्तावना** :- प्रस्तुत संशोधनाच्या विषयानुसार प्रस्तावना लिहून मार्गदर्शकांकडून तपासून घेवून त्याला अंतिम स्वरुप देण्यात येईल.

13.2 **प्रकरण दुसरे - पूर्व संशोधने व संदर्भ साहित्याचा आढावा** :- प्रस्तूत संशोधना करिता सदरिल विषयाच्या अनुषंगाने झालेलेली पूर्वीची संशोधने, संदर्भ साहित्यांचा आधार घेण्यात येईल. संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, शैक्षणिक नियतकालिके यांचा समावेश करुन संपूर्ण आढावा घेण्यात येईल.

13.3 **प्रकरण तिसरे - संशोधन पध्दती** :- प्रस्तुत संशोधनाकरिता सर्वेक्षण पध्दतीची वैशिष्टये लक्षात घेवून, संशोधन पध्दतीच्या पायऱ्या, जनसंख्या नविड, नमुना निवड, सामुग्री संग्रहाची साधने विकसन, साधनांची विश्वसनियता व सप्रमाणता, पथदर्शक अभ्यास माहिती संकलन इ. मुद्दे समाविष्ट करण्यात येतील.

13.4 **प्रकरण चौथे - माहितीचे संकलन व विश्लेषण** :- प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन कसे केले याचे थोडक्यात वर्णन, माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरलेल्या प्रगत सांख्यिकीय तंत्राच्या निवडीचे सकारण स्पष्टीकरण देऊन माहितीचे अर्थ विवेचन व निष्कर्ष देण्यात येतील.

13.5 **प्रकरण पाचवे - निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय** :- प्रस्तुत संशोधनातील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचे निष्कर्ष काय आलेत त्यानुसार शिफारशी करुन पुढील संशोधनासाठी विषय मांडणी करण्यात येईल.

13.6 **प्रकरण सहावे - संशोधनाचा सारांश** :- शेवटी प्रस्तूत संशोधनाचा सारांश थोडक्यात मांडण्यात येईल व संशोधन पूर्ण करण्यात येईल.

14. **संशोधन कार्यवाहीचे टप्पे** :-

समस्या निश्चिती

↓

संशोधन आराखडा लेखन

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखडा अंतीम मंजूरी

↓

पूर्व संशोधन व संशोधन संबाधित साहीत्याचा अभ्यास

↓

संशोधन पध्दतीचा आढावा

↓

संशोधन साधन निर्मिती

↓

माहिती संकलन

↓

अर्थ विवेचन

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

प्रत्यक्ष कार्यवाही

↓

संशोधन अहवाल लेखन

↓

अहवाल तपासणी व अंतीम मंजूरी

↓

अहवाल छपाई

↓

अहवालाचे संपादन

↓

अहवालास अंतिम रुप देणे

↓

अहवालाची बांधणी

↓

अहवाल सादरीकरण

15.संदर्भ ग्रंथ सूची

1. आगलावे प्रदिप (2000) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन.
2. उमाठे वि.तू. (1998) शैक्षणिक तत्त्वज्ञानाची मूलतत्त्वे, औरंगाबाद, विद्या बुक्स.
3. कदम चा.प. (2005) शैक्षणिक संख्याशास्त्र, पूणे नुतन प्रकाशन.
4. घोरमोडे के.यू. (2008) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर, विद्या प्रकाशन.
5. भिंताडे वि.रा. (2006) शैक्षणिक संशोधन पध्दती, पूणे, नुतन प्रकाशन.

शासन निर्णय

1. **प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र** कार्यक्रम - 2015
2. जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम -2017
3. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम -2009
4. महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणचा अधिनियम -2011
5. गुणवत्ता वाढ व गळती कमी काढण्या बाबत परिपत्रक.
6. शाळा व्यवस्थापन समिती शासन निर्णय .
7. नवीन शैक्षणिक धोरण शासन निर्णय.

संशोधक
दांडगे शंकर उत्तमराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ.म्हस्के विशाखा पांडुरंग
अधिव्याख्याता
श्री.शारदा भवन शिक्षण संस्थेचे अध्यापक महाविद्यालय नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रवेशासाठी (R.C.C.)

संशोधन आराखड्याची फाईल

संशोधकाचे नांव :- दांडगे शंकर उत्तमराव

मोबाईल नंबर :- 9421865662,8888316243

ई-मेल आय.डी. :- sudandge@gmail.com

कॅटेगीरी :- S.C.

फिजिकल हॅन्डीकॅप :- No.

मार्गदर्शकाचे नांव :- प्रा.डॉ.म्हस्के विशाखा पांडूरंग

मोबाईल नंबर :- 9890850161

ई-मेल आय.डी. :-

विषयाचे नांव :- शिक्षणशास्त्र (Educatian)

* संशोधन विषयाचे शीर्षक *

“परभणी जिल्ह्यातील ‘प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र’या कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास”